# श्री. लक्ष्मण तुकाराम खापेकर

सेवक क्र. १९१ मु. आदर्श विणकर कॉलनी, तांडापेठ, नागपूर

माझ्या कुटुंबात अनेक वर्षापासून देवतांना मानीत होते. त्याकरिता वर्षातुन अनेक वेळा कोंबडे-बकरे त्यांच्या नावावर कापत होते. तसेच वडिनांच्या अंगात शंकरजी, हनुमानजी, देवी इ. येत होते. त्यामुळे घरी पुष्कळसे लोक दुःख घेऊन येत होते आणि दुःख कमी होत होते. एके दिवशी आमचा भाचा फार आजारी पडला. त्याचे दुःख दूर होण्याकरिता त्याला आमच्या घरी ठेवण्यात आले. वडिलांनी बरेचसे प्रयत्न केल्यावरही त्या मुलाला समाधान मिळाले नाही. नंतर अनेक जाणत्यांनीसुध्दा प्रयत्न केलेत. तरी मुलाला आराम मिळाला नाही. एके दिवशी आम्हाला भगवान बाबा हनुमानजींच्या मार्गाबद्दल माहिती मिळाली. ह्या मार्गावर अनेक देवांची पुजा बंद करुनच मार्ग स्वीकारता येतो. आम्ही कुटुंबात मार्ग स्वीकारण्याबद्दल विचार केला व त्या मुलाच्या निमित्ताने हा मार्ग स्वीकारला. ह्या मार्गावर एकच भगवान म्हणून बाबा हनुमानजीच्या नावावर मरावे लागते. साध्या अगरबत्तीमध्ये मुलगा दगावला. कारण मुलांचे आई-वडील तांडापेठला राहत होते व त्याची मार्ग स्वीकारण्याची इच्छा नव्हती. म्हणून मुलगा दगावला हे आमच्या लक्षात आले. आमच्याकडून जुने दैवत सुटावे ह्याकरिता हा मार्ग स्वीकारला. आम्ही बेचाळीस दिवसाचे त्यागाचे कार्य ''महानत्यागी बाबा जुमदेवजी'' यांच्याकडून घेतले. आमचे बेचाळीस दिवसांची समाप्ती म्हणून दि. १७-१०-१९७० रोजी हवनकार्य करण्यात आले. या कालावधीत आम्हाला परिपूर्ण समाधान मिळाले व एका भगवंताचा परिचय मिळाला.

मार्गावर आल्यावर माझा लहान भाऊ विलास खापेकर हा टायफाईडने आजारी पडला. त्याचवेळी त्याची ड्रॉईंगची परिक्षा होती. तेव्हा तो परिक्षा देण्याकरिता शाळेत गेला. येतेवेळी पावसात भिजतच घरी आला. अकस्मात ओला झाल्यामुळे तो डबल टायफाईडने आलारी पडला. तीन आठवडे काहीच न खाता-पिता तो अंथरुणावर पडून राहिला. रविवारचा दिवस. त्याची प्रकृती एकदम बिघडली. त्याच्या शरीरातील हाडन हाड मोजता येईल इतका तो अशक्त झाला होता. घरी बरेचस नातेवाईक बसले होते. भाऊ वाचण्याची शक्यता नव्हती. तेव्हा मी महानत्यागी बाबा जुमदेवजींकडे गेलो व लहान भावाच्या प्रकृतीबद्दल त्यांना सविस्तर

सांगितले. बाबांनी दुःखाचे कारण विचारले. मी सांगितले, बाबा! आमचे वडील जुन्याच पध्दतीने वागतात म्हणून हे दुःख निर्माण झाले आहे. तेव्हा बाबांनी मला मार्गदर्शन केले. मला परमेश्वराला विनंती करण्याचा अधिकार दिला व सांगितले, तुम्ही स्वतः भगवान बाबा हनुमानजीला विनंती करा. घरी आल्यावर परमेश्वराजवळ कापराची ज्योत लावून भगवान बाबा हनुमानजीला विनंती करुन चुकीबद्दल क्षमा मागितली. तेव्हा त्याच क्षणी भावाच्या मुखातून हळूच शब्द निघाला. '' हे भाऊ, मला नेण्याकरिता चौघेजण आले, पहा, पहा! ते मला उचलत आहेत.'' भावाचे बोलणे ऐकुन मी त्याला ''भगवान बाबा हनुमानजी इनको हटाव'' असे म्हणायला सांगितले. त्याप्रमाणे भाऊ हळुच ''बाबा हनुमानजी इनको हटाव, बाबा हनुमानजी इनको हटाव, बाबा हनुमानजी इनको हटाव'' असे तीन वेळा म्हणाला. नंतर त्याच्याच मुखातुन शब्द निघाले ''भाऊ, भाऊ हे पहा, ते पळाले असे म्हणू लागला. हा परमेश्वरी चमत्कार पाहिल्यावर आता माझ्या भावाला काहीच होऊ शकत नाही असा विश्वास मला वाटु लागला. तेव्हा लगेच माझ्या मित्राला डॉक्टर झोडे यांच्याकडे पाठविले. डॉक्टरांनी घरी येऊन भावाला तपासले व ताबडतोब दवाखान्यात भरती करण्यास सांगितले. अॅबुलन्स बोलावल्यावर त्याला मेयो हॉस्पीटलमध्ये नेण्यात आले.तिथे नेल्यावर डॉक्टरांनी चौकशी रुममध्ये त्याची ट्रीटमेंट करण्यास सुरुवात केली. काही वेळाने त्याला वार्डात नेण्यात आले. तिथे नेल्यावर बऱ्याचशा डॉक्टरांनी त्याला तपासले. वार्डप्रमुख डॉक्टरांनी तपासल्यावर ते मला म्हणाले, तुमच्या भावाला दुरुस्त होण्याकरिता कमीत कमी सहा महिने लागतील कारण तो फारच अशक्त झालेला आहे. तेव्हा मी डॉक्टरांना म्हणालो, ''डॉक्टरसाहेब, भगवान चाहे तो सात दिन मे ठीक कर सकता है'' आणि खरोखरच परमेश्वराने माझे शब्द एकलेत व खरे केलेत. माझ्या भावाला सात दिवसातच दवाखान्यातुन सुटी मिळाली. अशी ही परमेश्वराची आर्तकलीला.

माझा मुलगा राकेश खापेकर, वय सहा वर्षे हा १-१०-१९८४ रोजी तापाने आजारी पडला. त्याचा ताप सारखा वाढून १०२ डिग्रीपर्यंत गेला. दुसऱ्या दिवशी सकाळी थर्मामिटरने मोजल्यावर १०३ डिग्री ताप होता. तेव्हा मी परमेश्वराला कापूर लावून विनंती केली व म्हणालो, 'भगवान बाबा हनुमानजी, महानत्यागी बाबा जुमदेवजी' जोपर्यंत माझ्या मुलाचा ताप कमी होत नाही तोपर्यंत मी अन्न ग्रहण करणार नाही. तेव्हा ताप हळूहळू कमी होत गेला. सायंकाळी त्याचा ताप १०० डिग्रीवर आला. नंतर रात्री आठ वाजता मोजला तेव्हा तो ९७ डिग्री म्हणजेच एकदम कमी होता. तेव्हा मी परमेश्वराला विनंती केली व माझा त्याग सोडला. परमेश्वराकडून जेवणाची परवानगी घेतली. मुलगा खेळु लागला. तेव्हा पत्नीने जेवण करण्याकरिता ताट केले. तितक्यात शेजारच्या एका बाईने त्यांच्याकडे शिजलेली मासोळी पत्नीला आणून दिली. पत्नी जसजसी मासोळी खायखी तसतसा तोच मुलगा पोटासाठी

तडफडायचा. आमचे जेवण होईपर्यंत मुलगा मासोळीसारखा तडफडत होता. त्यामुळे त्याला श्वास घेता येत नव्हते. बोलता येत नव्हते आणि नंतर त्याने डोळेसुध्दा फिरविले. तेव्हा मी त्याचे दुःख पाहून परमेश्वरालाल चुकी झाल्याबद्दल क्षमा मागितली. त्याला तात्पुरता आराम वाटायचा आणि पुन्हा मासोळीसारखा तो तडफडायचा. मुलाची अशी अवस्था झालेली पाहून मी पत्नीला श्रीमान गणपतराव टाकळीवर यांच्याकडे पाठविले. गणपतराव घरी नव्हते. पत्नी तशीच परत आली. ती घरी परत आल्याबरोबर झालेली चुक एकदम माझ्या लक्षात आली. मी पत्नीला म्हणालो, आजचा माझा त्यागाचा दिवस असताना तु मासोळी खाल्ली आणि ती मासोळी त्या मुलाच्या पोटात जाऊन तडफडू लागली. या चुकीबद्दल तु परमेश्वराला त्याची क्षमा माग. मी मुलाला दवाखान्यात घेऊन जातो. असे सांगून मी मुलाला घेऊन दवाखान्यात निघून गेलो. दवाखान्यात गेल्यावर डॉक्टरांनी तपासले व औषध लिहून दिली. घरी परत येतेवेळी मुलाचे पोट दुखणे एकदम कमी झाले व हसतच मी मुलाला घेऊन घरी आलो. मुलगा स्वस्थपणे झोपला. हा सत्य अनुभव परमेश्वरी कृपेने प्रत्यक्ष घडलेला आहे. अशा कृपेला मी जीवनात सांभाळून ठेवीन. तसेच महानत्यागी बाबा जुमदेवजीच्या मार्गदर्शनाप्रमाणे जीवनात चालीन, असे मी सत्य वचन देतो.

* * * * *